# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांक:- २७/०१/२०१८

### जळगाव खुर्द शिवार, ता.नांदगाव येथे रंगले थरार नाटय - राहता येथील मोक्क्याचे गुन्हयातील सराईत गुन्हेगार ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील नांदगाव पोलीस ठाणे हद्दतीत जळगाव खुर्द शिवारात काही सराईत दरोडेखोर वास्तव्यास असल्याची गुप्त बातमी नांदगाव पोलीसांना मिळाली होती. सदर दरोडेखोर दरोडा घालण्याच्या तयारीत असल्याची खात्रीशीर बातमी मिळालेवरून नांदगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बशीर शेख व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी आज रोजी सकाळी जळगाव खुर्द परिसरात जावुन सराईत गुन्हेगारांवर करडी नजर ठेवुन सापळा रचला. सदर ठिकाणी दडुन बसलेल्या आरोपीतांना पोलीस आपल्या मागावर असल्याची भनक लागली, त्यामुळे त्यांनी तेथुन शिउरबंगला रोडने पळ काढला. पोलीसांनी सदर आरोपीतांचा पाठलाग करून ०२ आरोपीतांना दरोडा टाकण्याचे साहित्य साधने व बिगर नंबर प्लेटचे पल्सर मोटर सायकलसह जागेवरच ताब्यात घेतले. तसेच सदर ठिकाणाहुन पळुन गेलेले इतर आरोपीतांच्या मागावर पोलीस पथक पाठलाग करत असतांना शिउरबंगला रोडने अहमदनगर पोलीस दलाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी हे सुध्दा सदर आरोपीतांचे मागावर असल्याचे समजलेवरून नांदगाव पोलीस व अहमदनगर पोलीस पथकाने संयुक्तरित्या सदर आरोपीतांचा पाठलाग सुरू केला. दरम्यान माणिकपुंज धरणाच्या दिशेने एका स्प्लेंडर मोटर सायकलवर पळुन जात असलेल्या आरोपीस पोलीसांनी थांबण्याचा इशारा केला असता त्याने पोलीसांच्या दिशेने गोळया झाडल्या, त्यामुळे पोलीस निरीक्षक श्री. बशीर शेख यांनी पोलीस पथकांना सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला, मात्र सदर आरोपीने पुन्हा पोलीस पथकाच्या दिशेने गोळीबार केल्याने पोलीस निरीक्षक श्री. बशीर शेख यांनी प्रत्युत्तर म्हणुन स्वसंरक्षणार्थ आपल्या सर्व्हीस रिव्हॉल्वर मधुन आरोपीतांच्या दिशेने फायर केला. त्यानंतर पोलीस पथकांनी चाहुबाजूंनी सापळा रचुन सदर आरोपीस हिरो होंडा स्प्लेंडर मोटर सायकल एम.एच.१७.बी.के. १४७९ या दुचाकीसह शिताफिने ताब्यात घेतले. नांदगाव पोलीसांनी सदर ठिकाणाहुन दरोडयाचे तयारीत असलेले एकुण ०५ आरोपींपैकी ०३ आरोपीतांना शिताफिने ताब्यात घेवुन त्यांना नांदगाव पोलीस ठाणेस हजर केले.

सदर थरार नाटयाचे वृत्त समजताच नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो,** अपर पोलीस अधीक्षक मालेगाव **श्री. हर्ष पोद्दार सो,** मालेगाव शहर उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक **श्री. गजानन राजमाने**, निफाड उपविभागचे पोलीस उपअधीक्षक **श्री. दिपक गि-हे**, तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे **पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी त्यांचे पथकांसह घटनास्थळी धाव घेतली. मा. पोलीस अधीक्षक सो यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता सदर आरोपीतांची कसुन चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार ताब्यात घेतलेल्या आरोपीतांकडे सखोल चौकशी करता त्यांनी त्यांचे नाव **१) दिपक आंबादास पोकळे,** वय २५, मुळ रा. लोहारे, ता.राहता, जि.अहमदनगर, ह.मु. साकोरे, ता.राहता, जि.अ.नगर, **२) रामनाथ गोरख मोरे,** वय २५, रा. पिंपळवाडी, ता.राहता, जि.अहमदनगर, **३) अनिल ज्ञानेश्वर शिंदे,** वय १९, रा. पुणतांबे, ता. राहता, जि.अहमदनगर असे सांगितले. ताब्यात घेतलेले आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन अहमदनगर पोलीस त्यांचा ब-याच दिवसांपासुन शोध घेत होते. यातील आरोपी **नामे दिपक आंबादास पोकळे हा अट्टल गुन्हेगार** असुन त्याचेविरूध्द अहमदनगर जिल्हयातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, जबरीचोरी, खंडणी, आर्म ॲक्ट असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहे. नगर पोलीसांनी सदर आरोपीतांविरूध्द राहता पोलीस ठाणेस मोक्का अंतर्गत कारवाई केलेली असुन ते ब-याच दिवसांपासुन फरार होते.

नाशिक ग्रामीण पोलीस दलातील नांदगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बशीर शेख यांनी त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचेसह वरील आरोपीतांना शिताफिने ताब्यात घेवुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ताब्यात घेतलेले वरील ०३ आरोपी व त्यांचे इतर साथीदारांविरूध्द नांदगाव पोलीस ठाणेस भादवि कलम ३९९, ३०७, ३५३ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपीतांचे कब्जातुन दरोडा तयारीचे साहित्य दोरी, मिरचीपुड, चाकु कटावणी, स्क्रु ड्रायव्हरसह, एक पल्सर व एक स्प्लेंडर मोटर सायकल हस्तगत करण्यात आली आहे. ताब्यात घेतलेले आरोपींचे इतर ०२ साथीदारांचा पोलीस पथक शोध घेत असुन पुढील तपास चालु आहे..

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़े. व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. हर्ष पोद्दार सा़े यांनी नांदगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. बशीर शेख व त्यांचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामगिरीबद्दल विशेष अभिनंदन केले आहे.